Vol. ... 6 Issue No. 12 Dec 2018
ISSN No. : 2320-9410

NIRRJ

# NEW INTERNATIONAL RELIABLE RESEARCH JOURNAL

Prathmesh Prakashan

Prathmesh Prakashan, Aurangabad.

- Chief Editor -
Asst. Prof. A. V. Hingmire

- Executive Editor -
Asst. Prof. L. M. Rathod

UGC Journal An Peer Reviewed International Journal

IMPACT FACTOR 2.009

# *NEW INTERNATIONAL*
# RELIABLE RESEARCH JOURNAL

## AIMS & SCOPE

New International Reliable Research Journal (NIRRJ) is a monthly International Journal publishing in multidisciplinary. It is published in All Subject and All Languages.

New International Reliable Research Journal (NIRRJ) has been started to publish the research paper by great thinkers, intelligentia, scholars, lecturers. Those who have contributed in the field of Higher Education and Research for advanced Knowledge.

**Chief Editor**
Asst. Prof. A.V. Hingmire

**Executive Editor**
Asst. Prof. L.M. Rathod

**The Editor, Editorial Board and Publisher assume no responsibility for statements and opinions expressed by the Author in this Research Journal**

Single Issue Rs. 300/-, Life Membership Rs. 10000/- (Ten Years)
Each Paper Rs. 1200/- Institution Yearly Rs. 3600/-

## Instruction Call for papers

The Papers must be an original constribution. The size of the paper should not exceed 2000 to 2500 words in A4 size. in MS-Office (Word), Time New Roman (Font size - 12) for English and ISM DVB-ttsurekh (Font size 14) font in Marathi and Hindi. along with paper should the title, Authors Name, mailing address and Telephone Nos.

**Mode of payment :** Payble at State Bank of India Ambajogai Dist. Beed
Account No. : 32887113235, Hingmire A.V.
IFSC Code : SBIN0003403

**For Details Information Please visit www.prathmeshpublication.in**

*NEW INTERNATIONAL*

# RELIABLE RESEARCH JOURNAL

## CONTENTS


| Sr. No. | Title & Name of the Author(s) | Page No. |
|---|---|---|
| 1 | **'सुनो शेफाली' नाटक में स्त्री संघर्ष का चित्रण**<br>डॉ. शिवाजी सांगोळे | 1 |
| 2 | **शिक्षणक्षेत्रात उच्चशिक्षित प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची अवहेलना**<br>श्री राठोड कैलास झाबुसिंग | 4 |
| 3 | **भारतीय शिक्षण पध्दतीचे प्राचीन दर्शन**<br>प्राचार्य डॉ. झेंडे सुखदेव सिताराम | 6 |
| 4 | CORRUPTION AND ITS IMPACT ON HUMAN RIGHTS<br>Dr. Bhosle Pundlik Eshwar | 10 |
| 5 | **अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांची अभिवृत्ती व समायोजन क्षमता यांच्या परस्पर सहसंबंधाचा अभ्यास**<br>डॉ. दिपा भुरे (हटवार) / डॉ. प्रशांत पाटील | 19 |
| 6 | **संगणकाच्या सहाय्याने शिक्षणातील परीक्षा पध्दतीतील बदल**<br>डॉ. बेलोकर के.ए. | 31 |
| 7 | **भक्ती चळवळीचा मराठवाडा**<br>मुंजाजी रंगनाथराव चोरघडे / डॉ. मुंजा बा. धोंडगे | 33 |
| 8 | STARATEGIES TO PROTECT CHILD RIGHTS<br>**Padmasree** | 38 |
| 9 | EMERGING TRENDS IN ECONOMICS EDUCATION<br>**Dr. Kishor H. Dhote** | 45 |

| | |
|---|---|
| 10 | लोकसाहित्यातील लोकाविष्कार<br>डॉ. स्मिता खोडे |
| 11 | भारतातील बँकींग क्षेत्रासमोरील आव्हाने<br>प्रा. डॉ.धनंजय माणिकराव पवार, |
| 12 | संतकाव्य आणि दलित काव्यातील विद्रोहामधील साम्य<br>गोरे मारुती प्रभु |
| 13 | Victimization Of High Fluoride Concentration In Groundwater From Fluoride Prone Area Of Loha Tq. Dist. Nanded, Maharashtra, India.– A Case Study<br>Dr. Krishnanand B. Patil |
| 14 | Agriculture in India: Adoption for bringing its development<br>SHAIK RAHEEM |

# संतकाव्य आणि दलित काव्यातील विद्रोह

**गोरे मारुती प्रभू,**
**संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद**
**मो.नं. ९४२१९८९६३८**

**सारांश-**

संत चोखामेळा, संत कर्ममेळा, संत बंका, संत सोयराबाई, संत कान्होपात्रा व संत तुकाराम यांना जीवन जगताना जे अनुभव आले, जे उपेक्षित जीवन वाट्याला आले तेच त्यांनी आपल्या काव्यातून मांडले आहे. अध्यात्मिक क्षेत्रात भक्तीच्या स्तरावर समानता प्रस्थापित व्हावी. आपल्यालाही विठ्ठलाची भक्ती करण्याची संधी मिळावी यासाठी त्यांनी विठ्ठलाकडे साकडे घातले. वेळप्रसंगी काव्यातून विद्रोहाची पेरणी केली. याच विद्रोहाचा धागा पकडून दलित काव्यातील विद्रोह आविष्कृत झाल्याचे दिसते. म्हणूनच संत काव्यातील विद्रोह आणि दलित काव्यातील विद्रोह यामध्ये काही प्रमाणात साम्य असल्याचे जाणवते. ते साम्य येथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. येथे अनेक संत होऊन गेले. त्यामध्ये संत ज्ञानेश्वर ,संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव, संत मुक्ताबाई, संत भानुदास, संत सावता माळी, संत गोराकुंभार, संत नरहरी सोनार, संत सेना न्हावी, संत जनाबाई, संत चोखामेळा, संत कर्ममेळा, संत सोयराबाई, संत एकनाथ, संत तुकाराम, संत निळोबा इत्यादींचा समावेश होतो. या सर्व संतांनी काव्य निर्मिती केली आहे. आपल्या मनातील भावना त्यातून व्यक्त केल्या आहेत.

आधुनिक काळात दलित काव्य उदयास आलेले दिसते. नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, दया पवार, वामन निंबाळकर, प्रल्हाद चेंदवणकर, ज.वि. पवार, अर्जुन डांगळे व त्र्यंबक सपकाळे अशा अनेक कवींनी दलित काव्याची निर्मिती केली आहे. त्यातून त्यांनी जीवन जगताना आलेले अनुभव दुःख, वेदना व आपल्या मनातील भावनांचा आविष्कार केला आहे. प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध विद्रोह पुकारला आहे. संतकाव्य आणि दलित काव्यातून जो विद्रोह प्रकट झाला आहे त्यामध्ये काही प्रमाणात साम्य दिसून येते याचा येथे विचार करण्यात आला आहे

**संशोधन विषयाचे उद्देश :**

१. संतकाव्य आणि दलित काव्याचा अभ्यास करणे.

२. संतकाव्य आणि दलित काव्यातील विद्रोह यामधील साम्य शोधणे.

३. निष्कर्ष मांडणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने संदर्भान्वयी व संश्लेषणात्मक, विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनासाठी संदर्भग्रंथ, कविता संग्रह व नियतकालिके या साधनांचा वापर केला आहे. संतकाव्य आणि दलित काव्यातील विद्रोहामधील साम्य विचारात घेताना सुरुवातीस आपणास विद्रोह म्हणजे काय ? याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. डॉ. सहदेव चौगुले-शिंदे म्हणतात "विद्रोह म्हणजे चिरंतन संघर्ष असतो. सहिष्णुतेचा अंत म्हणजे संघर्ष आणि पुढे विद्रोहाची सुरुवात होय, पण सहन न करणे म्हणजे स्वतःला अगदी सैल, सैरावैरा सोडणे नव्हे. विवेकाचे विद्रोहावर सतत प्रभुत्व, वचक व वर्चस्व असावे लागते."[१] थोडक्यात विद्रोह म्हणजे अन्यायाविरुद्ध केलेले बंड होय. विद्रोह हा संताप व तिरस्कारपेक्षा प्रगल्भ असतो. विद्रोहामध्ये सूडात्मक भावनेला स्थान नसते, तर विधायक व मानवतावादी विचारांचेच समर्थन येथे केले जाते. असा विधायक विद्रोह संतकाव्य आणि दलित काव्यातून आला आहे. या दोन काव्यातून आलेल्या विद्रोहातील साम्य येथे अभ्यासणे योग्य ठरेल.

संत चोखामेळा यांच्या काव्यातील विद्रोहाची नाळ दलित काव्यातील विद्रोहाशी जुळलेली दिसते. डॉ. सुनील चंदनशिवे म्हणतात " विसाव्या शतकात निर्माण होणाऱ्या दलित कवितेची बीजं ही चोखामेळाच्या अभंगात सापडतात. हाच दलित कवितेचा पहिला हुंकार आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही."[२] यावरून संत काव्यातील विद्रोह आणि दलित काव्यातील विद्रोह यामध्ये असलेले साम्य दिसून येते. यातीहीनतेचे दुःख व्यक्त करताना संत चोखामेळा म्हणतात,

"अवघ्या वर्णामाजी हीन केली जाती |
विटाळ विटाळ म्हणती क्षणोक्षणी || २ ||
कोणीहि अंगिकार न करिती माझा |
दूर दूर हो जा अवघे म्हणती || ३ || "[३]

संत चोखामेळा यांना अस्पृश्यतेचे चटके सोसावे लागले. आपला जन्म हीन जातीत झाल्याची त्यांना जाणीव होती. त्यासोबत येणारे सर्व दुःख त्यांना सोसावे लागले होते. त्यांचा उच्च वर्णियांना स्पर्श झ ाला तर विटाळ मानला जायचा. सर्वजन त्यांना दूर लोटत होते. जवळ घ्यायला कोणीही तयार नव्हते. आपले हेच दुःख, वेदना त्यांनी काव्याच्या माध्यमातून मांडले आहेत. असेच दुःख, वेदना दलित काव्यातही मांडल्या आहेत. अशा वेदना व्यक्त करतांना दया पवार म्हणतात,

"मिरवत चाललेला पाठीमागून देवाचा रथ
वयसुलभ उत्कंठतेने मी देवाला सामोरा गेलो
आणि मग... एकच कोलाहल जत्रेत उठला
रथाला म्हारडा शिवला... हाणा, मारा साल्याला"[४]

संत चोखामेळा यांच्या काव्यातून आलेला अस्पृश्यतेबद्दलचा विद्रोह दया पवार यांच्या काव्यातूनही आलेला दिसतो. देवाच्या रथाला सामोरे गेल्यामुळे गावकऱ्यांनी रथाला म्हारडा शिवला म्हणून त्यांना फरफटत मंडपाकडे नेले. ओल्या वादीच्या आसूडाने फटके मारले. अस्पृश्यतेच्या दाहकतेची जाणीव कवीने येथे करून दिली आहे. यातीहीनतेचे दुःख व्यक्त करताना संत कर्ममेळा म्हणतात,

"आमुची केली हीन याती |
तुज का न कळे श्रीपती || १ ||
जन्म गेला उष्टे खाता |
लाज न ये तुमचे चित्ता" || २ ||[५]

संत कर्ममेळा यांना हीन जातीत जन्म झाल्यामुळे अनेक दुःख, यातना सोसाव्या लागल्या आहेत. उष्टे खाण्यातच जन्म गेला. म्हणून ते विठ्ठलाकडे तक्रार करतात. आपल्या दुःखाला वाचा फोडतात. याच आशयाचे दुःख व्यक्त करताना वामन निंबाळकर म्हणतात

"अजून तरी कळले नाही
जात कशी असते, कोठे असते,
दिसत नाही म्हणून का ती माणसांच्या अंगात बसते ?
सारेच प्रश्न धुरासारखे तरंगत जातात
आणि विचारांची तडफडत असते वात
पण कळत नव्हते तेंव्हा कळले
आपली खालची जात"[६]

संत कर्ममेळा आणि वामन निंबाळकर यांच्या काव्यातील विद्रोहामध्ये साम्य दिसून येते. दोघांच्याही काव्यातून यातीहीनतेचे दु:ख व्यक्त झालेले आहे.

संत बंका यांच्या काव्यातूनही जातीजातीतील विषमतेची बोच व्यक्त होते. आपण हीन जातीत जन्मलो आहोत. त्याचप्रमाणे आपण निराधार आहोत या जाणिवेतून संत बंका यांनी विठ्ठलाचा धावा केला आहे. यातून संत बंका यांना आपण यातीहीन, दुर्बल व उपेक्षित असल्याची जाणीव झालेली दिसते. हीच उपेक्षीतपणाची जाणीव दया पवार यांच्या काव्यातून आलेली दिसते. तेंव्हा संत बंका आणि दया पवार यांच्या काव्यातील विद्रोहात साम्य जाणवते असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.

प्रस्थापित व्यवस्थेत शूद्रांना शिक्षण घेण्याचा किंवा वेदांचा अभ्यास करण्याचा अधिकार नव्हता. यावर भाष्य करताना संत तुकाराम म्हणतात,

" घोकाया अक्षर | मज नाही अधिकार || ३ ||
सर्वभावे दीन | तुका म्हणे यातिहीन" || ४ ||[७]

संत तुकाराम म्हणतात वेदाची अक्षरे घोकण्याचा मला अधिकार नाही. मी जातीने हीन असल्यामुळे सर्वदृष्टीने दीन आहे. जातीने हीन असणाऱ्यांना शिक्षणापासुन वंचित ठेवण्यात आले होते. ही जाणीव संत तुकारामांच्या काव्यातून होते. हेच दु:ख व्यक्त करताना त्र्यंबक सपकाळे म्हणतात,

"रेडा इथला,
वेदान्ती झाला
मैलोगणती दूर ठेवले
अक्षरशत्रू बनवून आम्हाला"[८]

दलित समाजाला शिक्षणापासून दूर ठेवल्याची भावना त्र्यंबक सपकाळे व्यक्त करतात. येथील रेडा वेद बोलला, पण आम्हाला लिहिण्या वाचण्यापासून मैलोगणती दूर ठेवले, अक्षरशत्रू बनवून. असा विद्रोही स्वर त्र्यंबक सपकाळे यांच्या काव्यातून निघतो. वरील दोन्ही काव्यातून आलेल्या विद्रोहात साम्य जाणवते.

**निष्कर्ष :**

१. विटाळ व अस्पृश्यता याविषयीची खंत संतकवी व दलित कवींनी व्यक्त केली आहे.
२. संतकाव्य आणि दलित काव्यात काही प्रमाणात साम्य जाणवते.
३. संत चोखामेळा यांच्या काव्यातील विद्रोहाची नाळ दलित काव्यातील विद्रोहाशी जोडलेली दिसते.
४. संत काव्यातील विद्रोह आणि दलित काव्यातील विद्रोहातून यातिहीनतेचे दु:ख व्यक्त झाले आहे.
५. दलित समाजाला शिक्षणापासून दूर ठेवल्याची भावना दोन्ही काव्यातून व्यक्त झाली आहे.

**समारोप**

संतकाव्य आणि दलित काव्यातील विद्रोहामधील साम्य यावर प्रकाश टाकतांना सुरुवातीला 'विद्रोह' ही संकल्पना स्पष्ट करण्यात आली आहे. यानंतर संतकाव्य आणि दलित काव्यातील विद्रोह यामधील साम्य सिद्ध करताना सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. शेवटी निष्कर्ष मांडून समारोप करण्यात आला आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**


१. डॉ. सहदेव चौगुले-शिंदे, शब्द आणि संकल्पना, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती २९ ऑगस्ट २०१३, पा. ४४
२. डॉ. सुनील चंदनशिवे, मराठी दलित कविता : एक चिकित्सक अभ्यास, डिंपल पब्लिकेशन, वसई, प्रथम आवृत्ती ६ डिसेंबर २००५, पा. १६
३. त्र्यंबक हरी आवटे (संपादक) श्री. संत गाथा, इंदिरा मुद्रणालय, पुणे, दुसरी आवृत्ती १९२३, अभंग क्रमांक १४७, पा. ८४
४. दया पवार, कोंडवाडा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती जुलै १९९४, पा. ३
५. त्र्यंबक हरी आवटे (संपादक) श्री संत गाथा, इंदिरा मुद्रणालय, पुणे, दुसरी आवृत्ती, १९२३, अभंग क्रमांक ३, पा. ९५
६. वामन निंबाळकर, गावकुसाबाहेरील कविता : आस्वाद आणि समीक्षा, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, पाचवी आवृत्ती २७ जुलै २०१४, पा. १६४
७. त्र्यंबक हरी आवटे (संपादक) श्री तुकाराम महाराज यांच्या अभंगाची गाथा, इंदिरा मुद्रणालय, पुणे, दुसरी आवृत्ती १९२३, अभंग क्रमांक ८३६, पा. ६३
८. त्र्यंबक सपकाळे, सुरुंग, अस्मितादर्श प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १४ एप्रिल १९७७, पा. ४२

ISSN : 2320 - 9410

NIRRJ

International Recognized Multidisciplinary Research Journal

# NEW INTERNATIONAL RELIABLE RESEARCH JOURNAL

## Certificate

This is to certify that our Editorial & Advisory Board accepted Research paper of

Dr./Sir/Smt. गोरे मारुती प्रभू

Topic संतकाव्य आणि दलित काव्यातील विद्रोहामधील साम्य

College / Institution

The Research is Original & Innovative. Your articles is published in the **Volume No.:** VI,

**Issue No.:** 12, **Month of** Dec. 2018

Asst. Prof. A.V. Hingmire
Chief Editor

Asst. Prof. L.M. Rathod
Executive Editor